# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

**खान बहादुर भाभा रूग्णालय कुर्ला (प) च्या आस्थापनेवर विविध संवर्गातील कंत्राटी तत्वावरील पद भरती .**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या अखत्यारित असलेल्या १६ उपनगरीय रुग्णालयांपैकी **खान बहादुर भाभा रूग्णालय कुर्ला (प)** या रुग्णालयाच्या आस्थापनेवरील खाली नमूद करण्यात आलेली विविध संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर ०६ महिन्यांच्या कालावधीकरीता (प्रत्येक ४५ दिवसानंतर खंड देऊन) ठोक मानधनावर भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्यासाठी सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज शुल्क रु. ७१०/- + १८ % जीएसटी १२८/- = रु. ८३८/- इतके भरुन अर्ज वितरीत करण्यात येतील .

सदर अर्जाची विक्री व स्विकृती **दि. १५.०४.२०२५ ते दि. २२.०४.२०२५** पर्यंत (कार्यालयीन वेळेत) संध्या. ४.०० वाजेपर्यंत खान बहादुर भाभा रूग्णालय कुर्ला (प) येथील आवक जावक विभाग, पहिला मजला येथे स्विकारण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या | दरमहा ठोस वेतन (रु.) |
|---|---|---|---|
| १ | समाज विकास अधिकारी (कम्युनिटी डेवलपमेंट ऑफिसर) | ०१ | रु.३०,०००/- |
| २ | कार्यकारी सहाय्यक (लिपिक) | ०१ | रु.२२,०००/- |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (लॅब टेक्निशियन) | ०३ | रु.२०,०००/- |
| ४ | क्ष-किरण तंत्रज्ञ (एक्स-रे टेक्निशियन) | ०१ | रु.२०,०००/- |
| ५ | कनिष्ठ ग्रंथपाल | ०१ | रु.२५,०००/- |
| ६ | कनिष्ठ आहारतज्ञ | ०१ | रु.२५,०००/- |

**अ) वयोमर्यादा:** उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण व ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे)

**ब) अर्हता:**

**१. समाज विकास अधिकारी:**

1. उमेदवार शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाचा समाज कार्यातील (Master of Social Work किंवा Master of Arts in Social Work) विषयात पूर्णवेळ पदव्युत्तर पदवीधारक असावा.
2. उमेदवार १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षा उत्तीर्ण असावा.
3. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी ' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.

4. उमेदवारास शासकीय/निमशासकीय/ महामंडळे/मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था किंवा अशासकीय संस्थांमधील सामाजिक कार्याशी संबंधित योजनांमध्ये किमान एक वर्षाचा सेवेचा अनुभव असावा.

**२. कार्यकारी सहाय्यक:**

1. अ) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा, आणि ब) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य, विज्ञान, कला, विधी किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा,
2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परिक्षा १०० गुणांचे मराठी व १०० गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
3. उमेदवाराकडे शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे.
4. उमेदवाराजवळ त्याने एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र. मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९ दि.०४.०२.२०१३ आणि शासन पूरकपत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.१६.०७.२०१८ मध्ये नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचानलयाने यासंदर्भात यापुढे वेळोवेळी निर्गमित केलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंमलात आणलेल्या परिपत्रकातील तरतुदी लागू होतील.
5. उमेदवाराला संगणकातील ऑपरेटिंग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशीट, प्रेझेंटेशन, डेटाबेस सॉफ्टवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे.

**३. प्रयोगशाळा तंत्रज्ञ:**

1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापिठाची (MSBT) ची / डी.ए.म.एल.टी. (DMLT) पदविका उत्तीर्ण असावा. (B.Sc. + D.M.L.T.) किंवा,
2. उमेदवाराने १२वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ यांचेकडील निम वैद्यकीय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडिसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा.
3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत ५० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
4. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर, स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.

**४. क्ष-किरण तंत्रज्ञ**

1. उमेदवार १२वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ ३ वर्षांचा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने ६ महिन्यांची इंटर्नशिप पुर्ण केलेली असावी (प्रथम प्राधान्य).

किंवा,

2. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेला असावा त्याचबरोबर मान्यताप्राप्त संस्थेकडून / विद्यापिठातून रेडियोग्राफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा
व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा १ वर्षांचा अनुभव असावा (व्दितीय प्राधान्य).

किंवा,

3. उमेदवार हा विज्ञान शाखेतील १२वी किंवा १२ (एमसीव्हीसी) नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडून / विद्यापिठातून रेडियोग्राफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नॉस्टिक सेंटर / रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा २ वर्षांचा अनुभव असावा (तृतीय प्राधान्य).
4. उमेदवारास खात्यातर्फे घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

5. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत ५० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी
विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

6. उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर,
स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा
जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी
संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.

**५. कनिष्ठ ग्रंथपाल -**

- उमेदवार कला/वाणिज्य /विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधारक असावा
- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथपाल विज्ञान विषयातील पदवी (B.Lib)/ (B.L.I.S) धारण करणे अनिवार्य आहे.
- ग्रंथालयातील कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य दिले जाईल.
- टंकलेखनाचे ज्ञान ही अतिरिक्त अर्हता म्हणुन गणली जाईल.
- उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर, स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.
- उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांचा मराठी विषय (निम्मस्तर किंवा उच्चस्तर ) घेऊन उत्तीर्ण असावा.

**६. कनिष्ठ आहारतज्ञ -**

- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातुन विज्ञान शाखेतील होमसायन्स/न्युट्रीशन/ डायटेटिक्स विषय घेऊन पदवी उत्तीणे होणे आवश्यक आहे आणि त्याने मान्यताप्राप्त विद्यापीठाची /संस्थेची डायटेटिक्स /न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदवी (एम.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

किवां

- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातुन विज्ञान शाखेतील होमसायन्स/न्युट्रीशन/ डायटेटिक्स विषय घेऊन पदवी उत्तीणे होणे आवश्यक आहे आणि त्याने मान्यताप्राप्त विद्यापीठाची /संस्थेची डायटेटिक्स/ न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदविका (पी.जी.डी.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (पदवी, पदव्युत्तर पदवी /पदव्युत्तर पदविका दुरस्थ शिक्षणाद्वारे प्राप्त केलेली नसावी.
- उमेदवाराने किमान १०० खाटा असणा-या रूग्णालयातील आहार नियोजनाचा ३ वर्षाचा अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयात आहारतज्ञ म्हणुन प्रशिक्षण घेतलेल्या पुर्ण केलेल्या उमेदवारांचा सदर प्रशिक्षण कालावधीसुध्दा अनुभव म्हणुन ग्राह्य धरून त्यांचा निवडीसाठी प्राधान्याने विचार केला जाईल.
- नोंदणीकृत आहारतज्ञांना प्राधान्य दिले जाईल.
- उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर, स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.
- उमेदवाराला आवश्यक ते मराठीचे ज्ञान असावे.
- उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत ५० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**क) निवडीची कार्यपध्दती – निवडीचे निकष**

- अंतिम पदवी / पदविका परीक्षा ३ पेक्षा जास्त प्रयत्नात (Attempt) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
- विहित केलेल्या अर्हता / अटी / शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनी त्यांच्या अंतिम वर्षातील प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- दोन किंवा अधिक उमेदवारांचे अंतिम वर्षातील गुण समान झाल्यास उमेदवाराच्या प्राधान्य क्रमाकरिता खाली दिलेले निकष क्रमवारीनुसार विचारात घेण्यात येतील.
  - » अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता
  - » उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक
  - » वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास, वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.
- उपरोक्त निकषांनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**ड) कर्तव्ये व जबाबदाऱ्या -**

ज्या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना त्यांच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.

1) उमेदवार रुग्णालय प्रमुख / त्यांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी / अधिसेविका कार्यालय / संबंधित विभागप्रमुख यांच्या अखत्यारीत आणि मार्गदर्शनाखाली कर्तव्य पार पाडतील.
2) उमेदवारांना चक्रांकित पध्दतीने तीनही सत्रांमध्ये आवश्यकतेनुसार कर्तव्य बजावावे लागेल.
3) उमेदवारांना नियमानुसार रुग्णालय प्रशासनाने तयार केलेल्या व रुग्णालय प्रमुख ह्यांनी मंजुर केलेल्या ड्युटी लिस्ट प्रमाणे साप्ताहिक सुटी व पूरक रजेचा लाभ मिळेल.

4) उमेदवारांना परिपत्रक क्र. संचालक/वैशिप्ररु/३६४४ दि.१४.१०.२०२३ अनुसार सहा महिन्यांकरीता समप्रमाणात एकूण ७ $^{१}/_{२}$ दिवस नैमित्तिक रजेचा लाभ संबंधित विभागप्रमुखांच्या पुर्वमंजुरीने देण्यात येईल.

5) उमेदवारांना रुग्णालय प्रशासनाने / रुग्णालय प्रमुख ह्यांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिकारी ह्यांच्या आदेशांनुसार अपवादात्मक / आपात्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार रुग्णालयातील इतर विभाग, बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग आणि अतिदक्षता विभागामध्ये काम करावे लागेल.

6) कंत्राटी कर्मचाऱ्यांना रुग्णालयात कर्तव्य बजावताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल. तसेच संबंधित रुग्णसेवेसाठीची न्याय वैद्यकीय (Medico Legal) जबाबदारी घ्यावी लागेल.

7) उमेदवारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक, वरिष्ठ नागरिक, महापालिका वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व समाजसेवी कार्यकर्त्यांशी सौजन्याने वागावे. महानगरपालिकेची व रुग्णालय प्रशासनाची प्रतिमा मलीन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

8) उमेदवाराने कंत्राट कालावधीमध्ये रुग्णालयात काम करीत असताना महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन केल्यास, काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास, संबंधित विभागातील कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच रुग्णसेवेमध्ये निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराला कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**ई) सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

(१) रुग्णालयाच्या आस्थापनेवर असलेल्या रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार कंत्राटी उमेदवारांची नेमणूक करण्यात येईल. तथापी कंत्राटी उमेदवारांना महापालिकेतील नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

(२) जाहिरातीमध्ये दिलेली पदांची संख्या आवश्यकतेनुसार कमी करण्यात येईल.

(३) अर्ज स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

(४) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराने जवळ बाळगाव्यात.

(५) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राटी तत्वावरील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

(६) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

(७) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

(८) उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे / व्यावसायिक अर्हता / संबंधित गुणपत्रिका / अनुभवाचे प्रमाणपत्र / नेमणूक पत्र यांच्या मूळ प्रती व स्वसाक्षांकित छायांकित प्रतींसह पडताळणीसाठी उपस्थित रहावे.

(९) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार मूळ कागदपत्रांच्या पडताळणीचा दिनांक, वेळ व ठिकाण उमेदवारांना भ्रमणध्वनी / ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

(१०) उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी आणि पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

(११) निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यापूर्वी त्यांना रु.५००/- किंमतीच्या स्टँपपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

(१२) कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांना निवासस्थानाची व्यवस्था केली जाणार नाही.

(१३) कंत्राटी उमेदवारांची आवश्यकतेनुसार १६ उपनगरीय रुग्णालयात नेमणूक / बदली करण्यात येईल.

(१४) उमेदवारांची नेमणूक पूर्णत: कंत्राटी पध्दतीने प्रत्येक ४५ दिवसांनंतर १ दिवस सेवाखंड देऊन एकावेळी एका महिन्यांच्या कालावधीकरीता करण्यात येईल. नियमित तत्वावर भरतीव्दारे उमेदवार प्राप्त झाल्यास सदरहू कंत्राटी उमेदवाराची नियुक्ती तात्काळ प्रभावाने संपुष्टात येईल.

(१५) सदर नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने त्यांना महापालिकेच्या नियमित सेवेमध्ये संबंधित पदावर कायमस्वरुपी नियुक्तीसाठी हक्क किंवा प्राधान्य मागता येणार नाही.

**फ) विशेष सूचना:-**

१. यापूर्वी संबंधित कार्यालयात किंवा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले / टपालाव्दारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज लिहिणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

३. जर एखाद्या उमेदवाराने कंत्राटी भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

४. मध्यस्थ / ठग / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनापासून उमेदवारांनी सावध रहावे.

५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मान. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

**सही/-**

**वैद्यकीय अधिक्षक**

**खा.ब.भाभा रूग्णालयकुर्ला (प)**